* माहिती *

**वाशिम जिल्हा पोलीस दल**

visit as http://www.washimpolice.org

प्रेस नोट

---

**मा.पोलीस अधिक्षक श्री. वसंत परदेशी यांचे मार्गदर्शनाखाली जिल्हयात अवैध धंदयाविरुध्द कार्यवाही.**

मा. पोलीस अधिक्षक श्री.वसंत परदेशी यांनी अवैध धंदयाविरुध्द सुरु केलेल्या विशेष मोहिमे अंतर्गत संपुर्ण वाशिम जिल्हयामध्ये दिनांक ११/०३/२०१९ रोजी विविध कारवायांचा तडाखा दिला. त्यामध्ये वाशिम जिल्हयात दारुबंदी कायदयाखाली एकुण ११ गुन्हे नोंद करुन त्यांचे कडुन २७,६००/– रुपये किमतीचा देशी व विदेशी दारुचा साठा जप्त केला. तसेच जुगार कायदयाअंतर्गत २ गुन्हे दाखल करुन ५,६२८/– रुपयाचा माल जप्त करण्यात आला. दिनांक ११/०३/२०१९ च्या रात्री विशेष मोहिमे अंतर्गत रेकॉर्डवरील जुन्या १८ आरोपींना मा. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे अटक केली व २३ जामीनपात्र वॉरंटची बजावणी केली, तर ७४ समन्सची बजावणी करण्यात आली. तसेच २ पाहिजे आरोपींना अटक करण्यात आली. नाकाबंदी दरम्यान २३२ वाहने चेक करण्यात आली.

मतदान प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत ऑल आऊट ऑपरेशन,नाकाबंदी अशाप्रकारच्या मोहिम दररोज राबविण्यात येणार आहेत. तरी सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, आपणास काही आक्षेपाहर्य आढळल्यास त्याबाबत आपण निसंकोच पणे नियंत्रण कक्ष वाशिम येथे माहिती कळवावी. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल.

Sthakare 12/3/19

पोलीस निरिक्षक

स्थानिक गुन्हे शाखा,वाशिम